## L. A. BILL No. XXI OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९४९ चा ५९. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२१ रोजी,
२०२१ चा महा अध्या ४. महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३० सप्टेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

१९४९ चा ५९.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

२०२१ चा महा.

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर तीन पालिका सदस्य, परंतु दोनपेक्षा कमी नाहीत व चारपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :".

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२१ चा महा. अध्या. ४

**३.** (१) महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या तत्कालिन विद्यमान तरतुदींनुसार, महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून फक्त एक पालिका सदस्य निवडून देण्यात येत होता. राज्यातील महानगरपालिकांच्या क्षेत्रातील कोविड-१९ साथरोगामुळे उद्भवलेल्या आरोग्यविषयक संकटाला तोंड देत असताना, महानगरपालिकांमध्ये बहु-सदस्यीय प्रभाग पद्धती असणे आवश्यक आहे असे वाटले. अशा स्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि महानगरपालिकांचे कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने, राज्य शासनास उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये यथोचितरित्या सुधारणा करणे इष्ट वाटले.

२. महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर तीन पालिका सदस्य, परंतु दोन पालिका सदस्यांपेक्षा कमी नाहीत व चार पालिका सदस्यांपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते. त्या प्रयोजनाकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम ५ मध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ४), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१.

**एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.

## सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक २१.—महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

### (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)

### (सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)

**१. ते ४.** ** ** **

**५.** (१) व (२) ** ** ** महानगरपालिकेची रचना.

(३) पालिका सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्यांची संख्या व सीमा [१][राज्य निवडणूक आयुक्त] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील. [२][म्हणजे ज्यायोगे, व्यवहार्य असेल तितपत, सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्रे होतील आणि प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या अगदी अलीकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार अदमासे तीच राहील. प्रत्येक प्रभाग फक्त एकाच पालिका सदस्यांची निवड करील.]

[४][**स्पष्टीकरण.—** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या “अलीकडच्या जनगणनेची आकडेवारी” या शब्द प्रयोगाचा अर्थ,—

(अ) अंतिमतः प्रसिद्ध झालेली अलीकडच्या जनगणनेची आकडेवारी असा असेल आणि अलीकडच्या जनगणनेची अंतिम आकडेवारी प्रसिद्ध होईपर्यंत त्याचा अर्थ अशा जनगणनेची प्रसिद्ध झालेली तात्पुरती आकडेवारी, असा असेल ; आणि

(ब) अलीकडच्या जनगणनेची संबंधित अंतिम किंवा तात्पुरती आकडेवारी उपलब्ध नसेल तेव्हा अलीकडच्या जनगणनेच्या लगतपूर्वी झालेल्या जनगणनेची संबंधित अंतिम आकडेवारी,असा असेल]

परंतु की, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर, परंतु महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०१९ **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु, तीन पेक्षा कमी नाहीत व पाच पेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य, निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.

[१][परंतु, आणखी असे की, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर, पोट-कलम (३) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना, अशा अधिसूचनेच्या तारखेनंतर घेण्यात आलेली सार्वत्रिक निवडणूक व त्यानंतरच्या निवडणुका या व्यतिरिक्त अन्य निवडणुकांच्या बाबतीत परिणामकारक असणार नाही.]

[३][आणखी असे की, पोट-कलम (३) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी तिचा मसुदा **शासकीय राजपत्रात** आणि ज्या रीतीने ही माहिती अशा मसुद्यामुळे बाधा पोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या निदर्शनास आणता येईल अशा [४][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] मते उत्कृष्ट असलेल्या अन्य रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे व त्या बरोबरच ज्या तारखेपर्यंत किंवा तारखेपूर्वी कोणतेही आक्षेप व सूचना स्वीकारल्या जातील ती तारीख आणि, ज्या तारखेनंतर मसुदा विचारात घेतला जाईल ती तारीख विनिर्दिष्ट करणारी नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे.]

(४) व (५) ** ** **

**५अ. व ५ब.** ** ** **

**६. ते ४९३.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१.]**

**[महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई